# -: प्रेस नोट :-

**३६ वर्षे पोलिसांना चकवा देणारा आरोपी अखेर पोलिसांच्या जाळ्यात ! तांत्रिक तपासाच्या आधारे बोरीवली पोलिसांची कारवाई**

बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई येथे दाखल गु.र.क्र. ७२/१९९० कलम ३०७,३४ भा.द.वि. मधील आरोपी ओमप्रकाश लालता पासी रा.ठि. हनुमान नगर, कांदीवली पुर्व, मुंबई हा सदर गुन्ह्याच्या सुनावणीच्या कामी मा. न्यायालयात वारंवार गैरहजर राहत असल्याने मा. न्यायालयाने त्यास फरार घोषित केले होते.

मा. न्यायालयाने फरार घोषित केल्यानंतर आरोपीने पोलिसांना चकवा देण्यासाठी आपला राहण्याचा पत्ता वारंवार बदलत होता. तब्बल ३६ वर्षे आरोपी पोलिसांच्या हाती लागत नव्हता. आरोपीचा ठावठिकाणा व संपर्क क्रमांक याबाबत सातत्याने तपास सुरू ठेवण्यात आला.

दरम्यान, पोलिसांनी पारंपरिक तपासासोबतच तांत्रिक तपासाची जोड देत आरोपीच्या हालचालींचा मागोवा घेण्यास सुरुवात केली. उपलब्ध तांत्रिक माहितीचे बारकाईने विश्लेषण करून आरोपीच्या संभाव्य वास्तव्याबाबत महत्त्वाचे धागेदोरे प्राप्त झाले.

प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीचा माग काढून त्याचे वास्तव्य निश्चित करण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी कौशल्यपूर्ण पद्धतीने कारवाई करून मा. वरिष्ठांच्या परवानगीने प्रतिबंधक अधिकारी पो.उ.नि. अतुल लांडगे, स.फौ. भालचंद्र थोरात, पो.ह.क्र. ०६०४२२/सुशांत तांबे, पो.शि.क्र. १११४१९/ कैलास उगले व पो.शि. १८१२२६/कदम यांनी मीरा रोड, जिल्हा ठाणे येथे जाऊन शोधमोहीम राबविली. सदर कारवाईदरम्यान पूनम रेसिडेन्सी, मीरा रोड पूर्व, जिल्हा ठाणे येथून आरोपी ओमप्रकाश लालता पासी यास शिताफीने ताब्यात घेण्यात घेऊन अटक करण्यात आली.

**अटक आरोपीताचे नांव पत्ता :**

१) ओमप्रकाश लालता पासी वय ५५ वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा.ठी. पूनम रेसिडेन्सी, मीरा रोड पूर्व, जिल्हा ठाणे

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ-२, मुंबई श्री. संदीप घुगे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. संतोष धनवटे, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती. पुष्पलता मंडले यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. दिग्विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बोरीवली पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रतिबंधक पथकाचे पोलीस उप निरीक्षक अतुल लांडगे, स.फौ. भालचंद्र थोरात, पो.ह.क्र. ०६०४२२/सुशांत तांबे, पो.शि.क्र. १११४१९/ कैलास उगले व पो.शि. १८१२२६/कदम यांनी अथक तपास करून बजावली.

- - ०० - -